CIDCO WE MAKE CITIES
प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. १३.०७.२०२१**

## सिडकोकडून प्रस्तावित मराठी भाषा भवन उपकेंद्राच्या उभारणीकरिता ऐरोली येथील भूखंडाचे राज्य शासनाकडे हस्तांतरण

सिडको महामंडळाकडून मराठी भाषा भवन उपकेंद्राच्या उभारणीकरिता महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाला देण्यात आलेल्या, नवी मुंबईतील ऐरोली येथील भूखंडाचे १३ जुलै २०२१ रोजी **मा. श्री. सुभाष देसाई, मंत्री, मराठी भाषा विभाग** यांच्या उपस्थितीत व सिडकोचे **उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी** यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोच्या अधिकाऱ्यांतर्फे हस्तांतरण करण्यात आले. या वेळी श्री. सुभाष देसाई यांनी सदर भूखंडाची पाहणी केली.

या प्रसंगी **श्री. मिलिंद गवादे, सहसचिव, मराठी भाषा विभाग, श्री. एस. एस. पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक सिडको, श्री. अनिल पवार, अपर जिल्हाधिकारी तथा महाव्यवस्थापक (वसाहत) सिडको, श्रीमती. प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी, सिडको, श्री. बी. डी. राठोड, सहाय्यक भूमापन अधिकारी, सिडको** तथा सिडकोचे अन्य अधिकारी उपस्थित होते.

“**मराठी भाषा भवन उपकेंद्राची इमारत ही बहुउद्देशीय सामाईक सुविधांनी युक्त असणार आहे. या इमारतीत ग्रंथालय, बैठकांसाठी बहुउद्देशीय सभागृह यांसह भाषाविषयक विविध उपक्रमांची कार्यालये व अध्यक्षांसाठी स्वतंत्र दालनांची व्यवस्था असणार आहे**”, अशी माहिती मा. श्री. सुभाष देसाई, मंत्री, मराठी भाषा विभाग यांनी या प्रसंगी दिली.

मराठी भाषा विकास व संवर्धनाकरिता कार्यरत असणाऱ्या भाषा संचलनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था, या संस्थांची कार्यालये मुंबईमध्ये वेगवेगळया ठिकाणी आहेत. यामुळे ही सर्व कार्यालये एकाच ठिकाणी आणून त्यामध्ये एकसूत्रता निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने २०१६ मध्ये सिडकोकडे भूखंडाबाबत विचारणा केली होती. त्यानुसार, सिडकोकडून ऐरोली येथील सेक्टर-१३ मधील भूखंड क्र. ६अ हा अंदाजे ३००० चौ.मी.

चा भूखंड मराठी भाषा भवन उपकेंद्राकरिता निश्चित करण्यात येऊन, दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने या भूखंडाचा ताबा राज्य शासनाला देण्यात आला.

त्याचप्रमाणे इमारतीची उभारणी करण्याची जबाबदारी शासनातर्फे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास देण्यात आली आहे अशी माहिती मा. श्री. सुभाष देसाई, मंत्री, मराठी भाषा विभाग यांनी दिली.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**